
आर्थिक जागरूकता आणि साक्षरता चळवळ...

# अर्थ संपदा



## ई दिवाळी अंक २०२३



पिगी बँकेचे अस्तित्व..

इलेक्ट्रिक वाहने कितपत फायदेशीर..?

UPI ची फिनिक्स भरारी ..!



आणखी बरेच काही...

## संपादकीय..

दिवाळी म्हणजे दिव्यांचा प्रकाश. दिवाळी म्हणजे एकमेकांना भेटण्याचा उत्सव. जितका आवडीने तो शहरात साजरा केला जातो तितकाच ग्रामीण भागातही या सणाचे उत्साहाने स्वागत करतात. दिवाळीला आपण दीपोत्सव म्हणतो, कारणं आपले आयुष्य असेच उजळत राहील अशी भावना प्रकट होते. अंधारावर उजेडाचा, वाईटावर चांगल्या गोष्टींचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, बलिप्रतिपदा किंवा दिवाळी पाडवा, गोवर्धन पूजा, भाऊबीज इत्यादी अनेक सणांचा एकत्रित आणि मोठा सण म्हणून दिवाळीला एक वेगळा मान आहे.

सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्याची हाक देणारा दिवाळी सण आपल्याला आर्थिक जबाबदारीचे महत्त्व पटवून देतो. दिवाळीला सोन्या चांदीबरोबर नवीन कपडे, वाहने अशा खरेदीला लोक प्राधान्य देतात. त्यामध्ये आर्थिक जागृती ही आलीच. आपण सर्व या गोष्टींचे कसे नियोजन करतो यावरती त्याचे महत्त्व अवलंबून आहे. अर्थसंपदाने ई दिवाळी अंकामध्ये अर्थपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. छोटे पण उपयुक्त आर्थिक माहितीचे लेख हे यावर्षीच्या पहिल्या ई दिवाळी अंकाचे वैशिष्ट्य आहे. आर्थिक घडामोडींचे आणि जागृतीचे धडे देण्यासाठी अर्थसंपदा सदैव प्रयत्नशील आहे. आपणा सर्वांना अर्थसंपदाकडून दिवाळीच्या तेजोमय शुभेच्छा..!!

**- अर्थसंपदा परिवार**

**www.arthasampada.com**

अर्थ संपदा

## ई दिवाळी अंक २०२३

# अंतरंग..


सोन्याचे आकर्षण .. ३

इलेक्ट्रिक वाहने कितपत फायदेशीर..? ५

पिगी बँकेचे अस्तित्व .. ७

UPI ची फिनिक्स भरारी..! ९

आत्मनिर्भर डिजिटल बँकिंग ...! १३

बँकिंग यंत्रणेला आव्हान सायबर हल्ल्याचे..! १६



# सोन्याचे आकर्षण..

- अर्थसंपदा टीम


गेल्या काही वर्षात सोने बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. सध्यातरी सोन्यालाच सोन्याचे दिवस आलेत असे म्हणायची वेळ आली आहे. हौसेला मोल नसते हे सिद्ध करत मागणी इतकी प्रचंड वाढली आहे की रिझर्व्ह बँकेला गोल्ड बाँडचे हत्यार उपसावे लागले. खरी गंमत पुढे आहे. सोन्याची मागणी वाढली म्हणून सोन्याच्या किमती वाढत होत्या. पण जसे जसे या किमती स्थिर न राहता वाढू लागल्या तशी मागणी घटली. पण सोने खरेदी करणाऱ्या नवीन ग्राहकांमध्ये मात्र आजही तोच उत्साह आहे. सोन्याची उपमा अनेक ठिकाणी दिली जाते. जसे सोन्याचे लग्न समारंभात महत्त्व आहे तसेच ते दसऱ्यासारख्या सणाला नवीन सोने खरेदी करण्यासाठी प्रवृत्त करते. याच सणाला सोने लुटले जाते. सोने खरेदीचा तर हा सुवर्ण मुहूर्त. पारंपरिक पद्धतीने सोने खरेदी करण्यासाठी लोक सहसा अशाच्य कोणत्यातरी संधीच्या शोधात असतात. एकेकाळी म्हणजेच ब्रिटिश आक्रमनापूर्वी आपला देश सोन्याने समृद्ध होता. भारतीय संस्कृतीमध्येच सोन्याला अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे ती परंपरा आजही कायम आहे.



अक्षय तृतीया व्यतिरिक्त भारतामध्ये पोंगम, ओणम, उगडी, करवा चौथ, बैसाखी इत्यादी सणामध्ये सोने आवर्जून खरेदी केले जाते व पेहरावाबरोबर घातले जाते. काहीजण सोन्याला शुभ मानतात. लग्नाच्या मोसमात सोन्याची मागणी 40 ते 50 % जादा असते.


बाजारपेठासुद्धा या मागणीला चांगला प्रतिसाद देतात. वेगवेगळ्या पद्धतीचे सोने अगदी ग्राहकाच्या पसंतीनुसार बनवले जाते. सोन्याच्या दराबरोबर घडणावळीचे कौशल्यही तितकेच जास्त असल्यामुळे त्याचे दरही स्पर्धात्मक आणि थोडे चढेच पाहायला मिळतात. तरीही लोकांनी सोन्याच्या मागणीला प्रोत्साहनच दिले आहे.

सोन्याचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. सोने हे सुरक्षित गुणवत्ता भांडवल असल्यामुळे अनेक लोक खरेदी करतात. त्याचे कॅशमध्ये रूपांतर लगेच होत असल्यामुळे सोन्याला high liquidity item असे संबोधले जाते. तुमच्याकडे सोने असेल तर अडीअडचणीला ते अगदी सहज बँकेमध्ये गहाण ठेवता येते. त्याच्यावर कमी व्याजदरात पैसे घेता येतात. बँका व सोनार त्याचे मूल्यांकन करताना जास्तीत जास्त रक्कम देण्याचा प्रयत्न करतात. अगदी 90% पर्यंत बँका कर्ज देताना आढळून येतात. काही दिवसापूर्वी रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांची सोने कर्ज देण्याची मर्यादा वाढवली होती त्यामुळे ग्रामीण भागातील लोक याचा फायदा घेताना दिसून येतात. जरी हे सत्य असले तरी लोकांचा सोने तारण कर्ज घेण्यामागे गरज हाच मुख्य उद्देश दिसून येतो. कारण सोन्याविषयी लोक जास्त भावनिक असतात. राष्ट्रीयकृत बँकांना पहिले प्राधान्य असले तरी छोट्या छोट्या पतसंस्था, क्रेडिट सोसायटी यांनीसुद्धा सोने कर्ज वाटपात स्वत:ची मक्तेदारी तयार केली आहे. तर शहरात नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या यामध्ये आघाडीवर आहेत.



2022 च्या तुलनेत 2023 मध्ये सोने तारण कर्जाची मागणी 15% हून जास्त आहे. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि जमा खर्चाशी संबंध येत असल्यामुळे इथेही सोन्याचे महत्त्व अबाधित आहे. बँकांच्या दृष्टीनेही सोने तारण कर्ज सुरक्षित कर्ज समजले जाते. जास्त कागदपत्रांची गरज नसल्याने ग्राहकही या कर्जाला प्राधान्य देताना दिसून येतात. तर काही बँका सोने तारण कर्जावर कोणतेही प्रक्रिया शुल्क आकारत नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या अलीकडील एका आकडेवारीनुसार मागील वर्षीचा तुलनात्मक अभ्यास केल्यास यावर्षी 90000 कोटीच्या कर्जाची नोंद झाली आहे. हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने खरोखरच लक्षणीय आहे.

येणाऱ्या दिवाळीत सुद्धा सोन्याची मागणी अनेक पटीने वाढेल व हौसेला मोल नसते याप्रमाणे भारतीय बाजारपेठा त्याच्या स्वागताला सज्ज होतील असे म्हणायला हरकत नाही.



# इलेक्ट्रिक वाहने कितपत फायदेशीर..?

**-अर्थसंपदा टीम**

दिल्लीच्या प्रदूषणाची पातळी वाढल्यानंतर तेथील सरकारने पार्किंग नियम आणखी कडक केले होते. साधारणतः हीच परिस्थिती सगळ्याच मेट्रो शहरात असताना प्रदूषणाची समस्या दिल्लीला जास्त असल्यामुळे नियमांवर बोट ठेवले गेले. काहींनी तर इंधनावर बंदी आणा अशी मागणी केली होती.

AQI म्हणजेच एअर क्वालिटी इंडेक्सची पातळी विनाशकारी किंवा अतिधोकादायक झाल्यानंतर सरकारने BS3 पेट्रोल, BS4 डिझेल वाहनांना मर्यादा आणल्या आहेत. डिझेलच्या अवजड वाहनांना तर दिल्लीमध्ये प्रवेश करण्यास अटकाव करण्यात आला आहे. हे सगळे प्रदूषण रोखण्यासाठी केले जात आहे ही आनंदाची बाब आहे. पण समाज म्हणून लोक स्वतःहून यामध्ये कितपत सहभागी होत आहेत हा संशोधनाचा विषय आहे. पारंपरिक इंधनाला पर्याय म्हणून इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचे काम मुंबईसारख्या मोठ्या मेट्रो शहरात होत आहे. मुंबई शहरात इलेक्ट्रिक वाहने थोड्या प्रमाणात दिसत आहेत, पण लोकांनी त्याचा अजूनही म्हणावा तसा स्विकार केलेला दिसून येत नाही.

## इलेक्ट्रिक वाहनांची आकडेवारी काय सांगते?

नोव्हेंबर 2022 ते ऑक्टोबर 2023 पर्यंत भारतात जवळपास 1400000 इलेक्ट्रिक वाहनांची विक्री झाली. जून 2023 वगळता ही विक्री प्रत्येक महिन्याला चढत्या क्रमानेच झाली. दुचाकी इलेक्ट्रिक वाहनांची म्हणावी तशी विक्री झालेली दिसून येत नाही. तसेही OLa इलेक्ट्रिक आणि TVS, बजाज शिवाय बाजारामध्ये फारसे तळागाळात पोहोचलेले ब्रँड अजूनतरी अस्तित्वात आलेले नाहीत. इलेक्ट्रिक चारचाकी प्रवासी वाहने थोड्याफार प्रमाणात विक्री होताना दिसून येत आहेत. बहुदा इंधन बचत आणि सर्वच कंपन्यांकडे उपलब्ध असलेले इलेक्ट्रिक वाहनांचे पर्याय त्याला कारणीभूत असावेत.

## इलेक्ट्रिक वाहने: सरकारचा दृष्टिकोन

वरती उल्लेख केल्याप्रमाणे केंद्र सरकार आणि राज्य सरकारे विविध पातळीवर प्रदूषण रोखण्यासाठी इलेक्ट्रिक वाहने वापरा असे सांगत आली आहेत. 2070 पर्यंत झीरो एमिशन उद्दिष्ट ठेवले आहे. इलेक्ट्रिक वाहनांना बूस्टर डोस देण्यासाठी FAME इंडिया योजना सुरू झाली होती. 2019 मध्ये त्याच्या दुसऱ्या टप्प्यासाठी म्हणजेच 5 वर्षासाठी 10000 करोड रुपयांची तरतूद करण्यात आली. ज्याचा मुख्य उद्देश इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढावी हा होता. हे सर्व ग्रीन इकॉनॉमीच्या दृष्टीने आवश्यक आहे असे सरकारचे मत आहे. त्यामध्ये तथ्यही आहे. इलेक्ट्रिक बॅटरी आणि अशा अनेक उपकरणांसाठी सरकारने योजना आणल्या आहेत. एकूणच काय, सरकारने याला गांभीर्याने घेतले आहे.

## इलेक्ट्रिक वाहने: सामान्यांना फायदा की तोटा?

अलीकडे सामान्य लोक इलेक्ट्रिक वाहन घेताना विचार करत आहेत. विशेषतः तरुण वर्ग त्यातील फायदा तोट्याचा बारकाईने विचार करताना दिसून येतोय. लोकांच्या दृष्टीने अनेक असे पैलू आहेत जे इलेक्ट्रिक वाहन घेताना विचार करण्यास भाग पाडतात. त्यापैकी काही खालीलप्रमाणे;

### 1. पायाभूत सुविधा

इलेक्ट्रिक वाहनांना चार्ज करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी चार्जिंग पॉइंट असणे आवश्यक आहे. ही सर्वात मोठी समस्या आहे. सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या भागात जिथे वाहनाची संख्या अधिक आहे अशा मेट्रो शहरांमध्ये ही सुविधा सक्रिय झाली आहे. इतर ठिकाणी मात्र एका चार्जिंग मध्ये वाहन बाहेर काढणे अवघड आहे. एखादे वाहन शहराच्या बाहेर गेल्यास त्याला पायाभूत सुविधेचा हवा तसा लाभ मिळत नाही ही सामन्यांची तक्रार आहे..

(उर्वरित पान १२ पाहा..)



# पिगी बँकेचे अस्तित्व..

-अर्थसंपदा टीम

**"पिगी बँक"** हा शब्द अलीकडील पिढीला कितपत परिचयाचा आहे हे सांगणे खरोखरच कठीण आहे. बँक हा शब्द त्यामध्ये असल्यामुळे कदाचित तो अनेकांना बँकेशी निगडित आहे असे वाटू शकते. थोडेफार त्यामध्ये तथ्यही आहे. पण डिजिटल बँकिंग क्रांतीने या संकल्पनेला मोठे आव्हान दिले आहे एवढे मात्र निश्चित. तसाही मुख्य डिजिटल बँकिंग आणि बचतीचे पारंपरिक माध्यमे यामध्ये फारसे सख्य नाही. किंबहुना छोट्या छोट्या बचतीसाठी किंवा 'सेविंग हॅबीट' लावण्यासाठी फार पूर्वीपासून पिगी बँकचा वापर केला जात होता, हे लक्षात घेण्यासारखे आहे. पिगी बँक म्हणजे नेमके काय हे जाणून घेण्यासाठी आपणाला थोडेसे मागे जावे लागेल.

मध्ययुगीन आणि प्राचीन काळात बँकिंग व्यवस्था मर्यादित आणि बार्टर व्यवस्थेवर किंवा देवाणघेवाण यावर आधारित होती. दळणवळणाची साधने इतकी मर्यादित असतानासुद्धा लोकांना बचत करण्याची सवय होती. पिग किंवा डुक्कराचा पिगी बँकेशी काही संबंध आहे का याचे कुठलेही पुरावे नाहीत. उलट अपघाताने हे नाव पडले असावे असेच अनेकजण म्हणतात. सुमारे 500-600 वर्षापूर्वी नाणी साठवण्यासाठी मातीच्या भांड्याचा उपयोग केला जायचा. त्या भांड्याला ' pygg ' असे म्हंटले जायचे. काहींनी त्याचा उच्चार 'पिग' म्हणून केला, तर काहींनी ते दोन्हीं शब्द सारखेच असून डिक्शनरीमध्ये वेग वेगळ्या पद्धतीने नोंदवले गेले आहेत असे संशोधन केले. तरीही त्यामध्ये मतभेद राहिलेच.

आयरिश लोकांची तर पिग म्हणजेच डुक्कर यावर खूप श्रध्दा होती आणि त्याला श्रीमंतीचे प्रतीक म्हणून ओळखले जायचे. अर्थात, त्यामध्ये व्यवसायिक गणिते होती हे विसरून चालणार नाही. हाच संबंध चिनी संस्कृतीशी जोडला गेला. तिथे तर डुकराच्या आकाराची भांडीच तयार होवू लागली आणि खऱ्या अर्थाने लोक त्याला पिगी बँक असेच म्हणू लागले. तर हे झाले ह्याचे थोडेफार ऐतिहासिक संदर्भ. थोडक्यात सांगायचे झाल्यास पिगी बँक हे बंदिस्त किंवा सोयीस्कर अशा भांड्यात पैसे ठेवण्याचे साधन होय

आपण आपल्या कामासाठी पैसे साठवत असतो. पूर्वी छोट्या भांड्यात एक छेद असायचा ज्यामध्ये लोक नाणी किंवा नोटेची दुमडी करून टाकायचे. ते भांडे दिवाळी महिन्यात किंवा काही कालावधीच्या अंतराने फोडले जायचे. सहसा ते मातीचे असायचे. काहीजणांच्या घरात कुंभार " भिशी घ्या भिशी" असे म्हणत ते पिगी बँकचे भांडे विकायचा. लोक त्याला चांगला प्रतिसाद देत असत. जसे जसे काळ पुढे सरकला तसे धातू किंवा प्लॅस्टिकच्या वस्तू पिगी बँकेच्या स्वरूपात विक्रीस आल्या. आज मॉलमध्ये किंवा ऑनलाईन खरेदी करताना दिसणारी पिगी बँकेची भांडी त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल. इतकेच काय, काही स्वयंचलित आणि रिमोट वस्तूच्या स्वरूपात पिगी बँक लहान मुलांना आकर्षित करताना दिसून येत आहेत. पण त्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळताना दिसून येत नाही.



आज काल लहान मुलांची झीरो बॅलन्स खाती उघडली जातात. खाती उघडण्याचे असंख्य पर्याय उपलब्ध झाले आहेत. कोणाचे किड्स खाते तर कोणाचे स्टूडेंट खाते अशा या ना त्या कारणाने लहान मुलांचा बँकेशी संबंध येतोय. पालक प्रत्येक लहान गोष्टींसाठी जागरूक झाले आहेत. कधी काळी पिगी बँक वापरणारी मंडळी आज पालक आहेत. मुलांना बचतीची सवय कशी लावायची हा मोठा प्रश्न आहे. बँकेत खाते उघडले म्हणजे मुले साक्षर होत आहेत किंवा त्यांना बचतीचे मार्ग सापडले असे समजण्याचे कारण नाही. मुळात अशी खाते त्यांचे पालक सांभाळतात. त्यातून किती निष्कर्ष काढायचा हे सांगणे महाकठीण. मुलांना प्रत्यक्ष आवडेल अशा छोट्या छोट्या गोष्टींतून बचत कशी होते हे समजावून सांगावे लागेल. अनेक पालकांना याबद्दल काहीच माहिती नाही खर्चाला दिलेले पैसे कसे वापरावे.. त्यातील काही पैसे शिल्लक राहू शकतात का याचा सारासार विचार पालकांनी केला पाहिजे व बचतीसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलांच्या अर्थ साक्षरतेची पहिली पायरी म्हणजे पिगी बँक आहेत हे विसरून चालणार नाही. **(पान क्र १५ पाहा...)**



# UPI ची फिनिक्स भरारी ..!

-अर्थसंपदा टीम

भारतीय डिजिटल बँकिंगचा कणा समजली जाणारी UPI व्यवस्था दिवसेंदिवस नवनवीन उंचीचे शिखरे गाठत आहे. एका क्लिकवर एका खात्यावरील पैसे दुसऱ्या खात्यात जाणे किंवा एखादा क्यू आर कोड स्कॅन केल्यावर पेमेंट होणे हे एखाद्या चमत्कारासारखे आहे. आंतरराष्ट्रीय स्थरावर याला दिग्गज देशांनी स्वीकारले असून भारतीय अर्थव्यवस्थेचा गौरव झाल्याचा निष्कर्ष काढायला हरकत नाही. सिंगापूर, यूएई, फ्रान्स इत्यादी देश यामध्ये आघाडीवर आहेत. तर नुकताच या यादीत श्रीलंकेने प्रवेश केला आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास या देशांमध्ये UPI पेमेंट स्वीकारले गेले आहे.

सिंगापूरच्या Pay Now बरोबर UPI चा करार झाला तेंव्हा साहजिकच इतर देशानीसुद्धा टुरिझम आकर्षित करण्यासाठी हे करार केले असावेत हे निश्चित. तरीसुद्धा त्यामधील वेगवान सुलभता हेच मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे. या व्यवहाराची प्रसिध्दी आणि उपयुक्तता पाहून हळू हळू ते इतर अनेक देशात स्वीकारले जाईल असेच वाटते.

## UPI आकडेवारी काय सांगते?

नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (NPCI) एका अलीकडील अहवालानुसार ऑक्टोबर 2022 च्या तुलनेत ऑक्टोबर 2023 मध्ये UPI च्या व्यवहारांची संख्या 50% जास्त आहे. 2022 मध्ये ती 7.31 बिलियन होती. आताच्या घडीला, म्हणजे ऑक्टोबर 2023 पर्यंत UPI व्यवहारांची संख्या 11 बिलियनहून जास्त पोहोचली आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास संपूर्ण डिजिटल व्यवहारांपैकी UPI व्यवहाराचा हिस्सा 80% हून अधिक आहे. म्हणजे फक्त 20% उरलेले डिजिटल व्यवहार होतात. ज्यामध्ये नेट बँकिंग/मोबाईल बँकिंग जसे की IMPS, NEFT RTGS इत्यादी व्यवहार होत आहेत. यातून UPI ची मक्तेदारी दिसून येते. हे आकडे भविष्यात वाढतच राहणार यात शंका नाही.

## UPI इतके प्रसिध्द का झाले आहे?

याची दोन प्रमुख कारणे दिसून येतात. एकतर ग्राहक म्हणून लोकांच्यामध्ये प्रचंड जागरूकता निर्माण झाली आहे. आणि दुसरे म्हणजे व्यापाऱ्यांच्या व्यवहारामध्ये मर्चंट बँकिंग पेमेंट चा एक सहज सोपा पर्याय उपलब्ध झाला आहे. थर्ड पार्टी कंपन्या बँक खाती जोडण्यात अग्रेसर आहेत. यामध्ये Google, PayTM इत्यादी उदाहरणे देता येतील. इथे एक लक्षात घेण्यासारखे आहे, ते म्हणजे मर्चंट पेमेंट करताना क्यू आर कोड स्कॅन करून लगेचच पेमेंट होत आहे, ज्यामध्ये सर्वच मोठ्या बँकांनी आघाडी घेतली आहे. समोरच्याला पेमेंट झालेले तात्काळ समजत असल्यामुळे UPI व्यवहारांची संख्या वाढली आहे असेही व्यापारी वर्गाचे म्हणणे आहे. भाजी मार्केट असो, ओला - उबेर असो किंवा अगदी चहाच्या टपरीवर चहा घ्यायचा असल्यास विक्रेता ग्राहकाला UPI करो असे म्हणण्यापेक्षा गूगल पे करो..किंवा PayTM -Phone पे करो असं म्हणताना दिसून येतो.

यातून एकच निष्कर्ष निघतो तो म्हणजे या व्यवहारांचे ब्रॅण्डिंग जबरदस्त झाले आहे. इतके की लोक त्या व्यवहार करण्याच्या पद्धतीला लोक कंपनीच्या नावानेच ओळखू लागलेत. पण या ना त्या कारणाने UPI व्यवहार वाढलेत हे नक्की. आणखी एक वैशिष्ट्य नोंद घेण्यासारखे आहे. ते म्हणजे UPI व्यवहार केल्यावर ग्राहकांना कॅश रीवर्ड्स किंवा अनेक सवलती मिळत आहेत. इतके की ऑनलाईन शॉपिंग करताना या सवलतीचा मर्यादित काळासाठी उपयोग करता येतो. काहींना तर थेट कॅश मिळत आहे. तर अनेक ग्राहकांना पॉइंट जमा होवून थोड्या कालावधीनंतर खात्यामध्ये कॅश जमा होत आहे. हे बाजारातील व्यापारी, थर्ड पार्टी कंपन्या आणि बँकांच्या सहकार्याने शक्य झाले आहे. त्यातील आर्थिक गणित कितीही वेगळे असले तरी सध्या ग्राहकांना व्यवहार करण्यासाठी UPI हेच माध्यम खात्रीशीर वाटते.

## UPI संदर्भात अलीकडील महत्त्वपूर्ण बदल


UPI ची उपयुक्तता वाढत असल्यामुळे NPCI, भारतीय रिझर्व्ह बँक आणि वित्त मंत्रालय अनेक नवीन बदल सुचवत आहे. तंत्रज्ञानाचा विकास झपाट्याने होत असल्यामुळे त्याचा फायदा डिजिटल बँकिंगला होईल अशी सर्वांनाच अपेक्षा आहे. त्यातल्या त्यात डिजिटल बँकिंगमध्ये UPI ची वाढती मक्तेदारी पाहता ते आणखी सक्षम करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत.

### 1. क्रेडिट कार्डशी जोडण्याचा निर्णय

अलीकडे रिझर्व्ह बँकेने क्रेडिट कार्डला UPI शी जोडण्याचा निर्णय घेतला. बऱ्यापैकी सर्वच बँकांनी ही सुविधा तात्काळ उपलब्ध करून दिली. याचाच अर्थ, तुम्हाला क्रेडिट कार्डचा वापर करून UPI व्यवहार करणे शक्य आहे. अगोदर हीच सुविधा डेबिट कार्ड सुविधा असेल तरच उपलब्ध होती. आता मात्र क्रेडिट कार्डने त्यामध्ये प्रवेश केला आहे

### 2.UPI Hello

UPI hello हे आणखी एक नवीन तंत्रज्ञान आहे. सध्या आपणाला व्यवहार करताना नंबर आणि संदेशाच्या स्वरूपात सूचना द्याव्या लागतात. त्यानंतर आपला व्यवहार पूर्ण होतो. आता मात्र आवाजाच्या आणि आपल्या स्थानिक भाषेत सूचना देवून हा व्यवहार पूर्ण करता येवू शकतो म्हणून UPI Hello ही सुविधा चालू करण्यात आली आहे. लवकरच सर्व भाषेत हे उपलब्ध होईल.




(छायाचित्र स्त्रोत : NPCI)

3. UPI lite X

UPI lite X हे आधुनिक तंत्रज्ञनाद्वारे पेमेंट करता यावे म्हणून ओळखले जाते. सहसा कोणताही व्यवहार करताना आपण इंटरनेट कनेक्शन असल्याशिवाय व्यवहार करू शकत नाही. यासाठी उपाय म्हणून NFC तंत्रज्ञानाद्वारे इंटरनेट कनेक्शन नसले तरीही UPI Lite X द्वारे व्यवहार करता येईल हा त्यामागचा उद्देश आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास UPI ने मोठी मक्तेदारी निर्माण केल्याचे दिसून येते. तुमच्या आमच्या जीवनाचा UPI अविभाज्य घटक बनलेला आहे. एका क्षणात कोणालाही पैसे पाठवण्याबरोबर पारंपरिक बँकेवरील अवलंबित्व कमी करण्यास भाग पाडले आहे. डिजिटल बँकिंग क्रांतीमध्ये UPI ने घेतलेली ही फिनिक्स भरारीच म्हणावी लागेल.

## (पान ६ वरून पुढे.. इलेक्ट्रिक वाहने कितपत फायदेशीर ?)

2. ई वाहनांची किंमत

फक्त भारतीय कंपन्यांचा विचार करायचा झाल्यास टाटा, महिंद्रा यांनी उत्कृष्ट इलेक्ट्रिक गाड्या निर्माण केल्या आहेत. पण पेट्रोल गाडीची किंमत आणि त्याच मॉडेलची इलेक्ट्रिक गाडीची किंमत यामध्ये बरीच तफावत दिसून येते. बाहेरील कंपन्यांच्या वाहनांमध्ये तर ही तफावत आणखी जाणवते. जवळपास दुप्पट किंमत मोजावी लागत असल्यामुळे इंधन बचतीवर सामान्य लोक फारसे स्वारस्य दाखवताना दिसून येत नाहीत. ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

3. ई वाहनांच्या उपकरणांची किंमत

हा भाग मुद्दामहून वेगळा चर्चिला जाणे गरजेचे आहे. ई वाहनांची उपकरणे अजूनही म्हणावी तेवढी प्रचलित नाहीत. त्याची उपलब्धता हा आणखी एक मोठा विषय आहे. बॅटरी किंमत किंवा त्यामधील अत्याधुनिक यंत्रणेविषयी सामन्यांमध्ये अजूनही कुतूहलता आहे. त्यातील किंमतीचा बोजा किती असू शकतो याची अनेकांना कल्पना नाही. ज्यांना त्याबद्दल माहिती आहे ते लोक त्याचा स्वीकार करत आहेत.

4. इंधनाची बचत

पारंपरिक इंधनापेक्षा इलेक्ट्रिक वाहने किफायतशीर आहेत असे अनेकांचे म्हणणे आहे. इंधन बचत डोळ्यासमोर ठेवून काहींनी त्याचे चांगल्या पद्धतीने गणित मांडले आहे. विशेषतः शहरातील तरुण वर्ग इलेक्ट्रिक वाहनांकडे आकर्षित झाला आहे. अर्थात पायाभूत सुविधांची शहरात सोय असल्यामुळे हा पर्याय उपलब्ध आहे असेही त्यांचे म्हणणे आहे.

# आत्मनिर्भर “डिजिटल बँकिंग ”..!




**-अर्थसंपदा टीम**

मागील कोविडचा काळ बँकिंग व्यवस्था ठप्प करणारा होता. त्याच्यापलिकडेही पूर्ण अर्थव्यवस्था बंदिस्त असल्यामुळे प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार करण्यास चालना मिळेल असे खूप कमी घडले. याच दरम्यान, बँकासुद्धा पूर्ण क्षमतेने सेवा देण्यासाठी खुल्या नव्हत्या. त्याला कारणही तसेच होते. कोविडचा काळ अनपेक्षित होता आणि सर्वजण आरोग्याच्या समस्येबाबत जागरूक होते. सरकारी यंत्रणा सुद्धा त्यासाठीच काम करत होत्या. त्यावेळेस आर्थिक व्यवहार करण्यासाठी लोकांनी डिजिटल बँकिंग सेवेचा जास्त वापर केला आणि भारतीय डिजिटल बँकिंगला एक वेगळी दिशा मिळाली. सर्वसामान्य लोकांनासुद्धा हा पर्याय अडचणीच्या काळात कसा उपयोगी पडतो याचे महत्त्व कळाले.

## डिजिटल बँकिंग वाढण्यामागची कारणे:

### बँकांचा सहभाग

बँकांनी ग्राहकांचा जबरदस्त विश्वास संपादन करत चांगल्या प्रकारे प्रचार केला. रिझर्व्ह बँकेच्या आणि आयकर विभागाच्या नियमानुसार कॅश म्हणजेच रोखीने व्यवहार करण्यास ठराविक प्रकारे बंधने घालण्यात आली.

अगदी दहा हजाराच्या वरती रोख रक्कम काढताना SMS बँकिंग किंवा सूचना मेसेज सुविधा देण्याचे रिझर्व्ह बँकेने सांगितले होते ज्याची अंमलबजावणी अनेक बँकांनी सुरू केली. यामुळे एक महत्त्वाचा फायदा झाला. कोणतीही व्यक्ती एखादी रक्कम काढत असल्यास एसएमएस सुविधेमुळे तिचा प्रत्यक्ष सहभाग वाढेल हा हेतू साध्य झाला.

### ऑनलाईन वापर

डिजिटल बँकिंग वाढण्यास कारणीभूत असलेला हा सर्वात महत्वाचा घटक आहे. ऑनलाईन शॉपिंग करत असताना कॅश व्यतिरिक्त अनेक डिजिटल पेमेंट गेटवेची माध्यमे आहेत जी ग्राहक आणि व्यापारी वर्गाला जोडतात. एका विशिष्ट मागणी केलेल्या वस्तूचे पैसे QR स्कॅन, UPI किंवा POS च्या माध्यमातून सहज करता येतात. डेबिट किंवा क्रेडिट कार्ड जवळ उपलब्ध नाही म्हणून पेमेंट होत नाही हा पर्याय आता राहिला नाही. आता तर कंपन्या आणि बँका कॅशबॅक आणि बोनस पॉईंटस् देतात. डिजिटल बँकिंग माध्यमाला हे पोषक वातावरण म्हणून बघता येईल. कारण इथे त्याची स्पर्धाच लागलेली दिसून येते.

### अद्यावत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

हा आणखी मोठा घटक आहे. बाजारामध्ये थर्ड पार्टी एप्लिकेशन्स इतकी आहेत की त्यामधील फायद्याचे कोणते आणि तोट्याचे कोणते हे समजत नाही. तरीही त्यांच्या वेगवान आणि आक्रमक सेवेच्या तत्परतेने ते सामान्य लोकांच्यात अधिक प्रसिध्द झाले आहे. एनालिटिक, API बँकिंगसारखी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करणारी माध्यमे नव्याने सुरू झालीत. आपल्या गाडीच्या काचेवरती लावलेले fastag स्टिकर हे एक त्याचे उदाहरण म्हणता. दुसरे म्हणजे ॲप वॉलेटमध्ये घेतलेले पैसे परत त्याच्याच सहाय्याने दुसरीकडे वापरता येवू शकतात. ही डिजिटल क्रांतीच आहे.

## याव्यतिरिक्त डिजिटल बँकिंगचे फायदे काय आहेत ते आपण पाहुयात;

### 1. वेगवान आणि सुलभता

डिजिटल बँकिंगचे अनेक प्रकार गेल्या काही वर्षांपासून अस्तित्वात आले आहेत. त्यातल्या त्यात मोबाईल बँकिंग आणि UPI सारख्या पेमेंट पद्धतीने आघाडी घेतली आहे. याला कारण आहे त्याची वेगवान पैसे पाठवण्याची प्रक्रिया. अगदी मोबाईल नंबर किंवा विशेष कोडने समोरच्याला पैसे पाठवता येतात. काही सेकंदामध्ये हा व्यवहार पूर्ण होतो.

## 2. भरपूर सुविधा आणि पर्याय

डिजिटल बँकिंगमध्ये तुम्हाला असे अनेक पर्याय दिसतील ज्याद्वारे तुम्हाला अनेक प्रकारच्या सुविधा मिळतील. बिल पेमेंट पासून महिन्याला खात्यामधून ठराविक कालावधीसाठी पैसे पाठवणे, बचत करणे इत्यादी सुविधा अगदी एका क्लिकवर उपलब्ध आहेत.

## 3. 24 तास बँकिंग

डिजिटल बँकिंग 24 कधीही करता येते. शाखा बँकिंग मध्ये मर्यादा असतात. पण आर्थिक व्यवहार करण्यासाठी कोणत्याही वेळेचे बंधन नाही. ही याची सर्वात मोठी खासियत आहे.

## 4. नियंत्रण

डिजिटल बँकिंगमध्ये बँकिंग करण्याचे स्वातंत्र्य आणि नियंत्रण ग्राहकाच्या बाजूने असते. ग्राहकाला एखादी सूचना द्यायची असल्यास ती डिजिटल माध्यमातून देता येते. खाते चालू करण्यापासून बंद करण्यापर्यंत अनेक गोष्टींचे नियंत्रण ग्राहकाकडे आहे ज्याचा त्याला त्याच्या सोयीनुसार उपयोग करता येतो.

थोडक्यात काय, डिजिटल बँकिंगचा वापर करून ग्राहक वर्ग वित्तीय समावेशा बरोबर बँकिंग सुविधांचा आणि आर्थिक व्यवहार करण्यासाठी आत्मनिर्भर बनला आहे.

**(पान क्र ८ वरून पुढे.. पिगी बँकेचे अस्तित्व.. )**

हल्ली " पॉकेट मनी" हा शब्द जास्त वापरला जातोय. तो मुलांच्या आवडीचा विषय झाला आहे. त्या तुलनेत पिगी बँक संकल्पना कालबाह्य होतेय की काय अशी भीती वाटते. डिजिटल बँकिंग किंवा मुख्य बँकिंग कितीही पुढे गेले तरी त्याचा सार आणि उद्देश एकच आहे. प्राचीन इतिहासापासून सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानापर्यंत, आर्थिक व्यवहारामध्ये आणि त्याच्या पद्धतीमध्ये अनेक बदल झाले आहेत. या सर्व बदलांचा साक्षीदार पिगी बँक आहे. त्यांचे अस्तित्व तसेच राहील आणि येणाऱ्या अनेक तरुण पिढ्या पिगी बँकेचा वापर करतील अशी आशा बाळगायला हरकत नाही. कारण इथे सवाल आहे आर्थिक साक्षरतेची पहिली पायरी असलेल्या बचतीच्या सवयीचा..!!




# बँकिंग यंत्रणेला आव्हान सायबर हल्ल्याचे..!

**-अर्थसंपदा टीम**

बँकिंग विश्वाला महत्त्वपूर्ण योगदान देणारी डिजिटल बँकिंग प्रणाली अलीकडील काही घडामोडींमुळे अस्वस्थ आहे. त्याला कारणही तसेच आहे. काही वर्षांपासून या प्रणालीवर होणारे हल्ले आणि त्यांची संख्या वाढतच आहे. पण त्याच्यापलिकडे जावून उपाययोजना करणाऱ्या अनेक प्रणालींचे साम्राज्य वाढूनसुद्धा सायबर हल्ले करणाऱ्यांची संख्या काही कमी होताना दिसून येत नाही. यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्हायरस निर्मिती करण्यामध्ये हल्लेखोर उजवे आणि पारंगत आहेत हेच यामध्ये दिसून येते.

सरकारी यंत्रणा आणि तंत्रज्ञान नियामक मंडळाचे सर्व लोक अटकाव करण्यासाठी अनेक कायदे करताना दिसून येत आहेत तरीसुद्धा म्हणावे तितके यश मिळालेले नाही. तंत्रज्ञान सुरक्षित आहे का..? आणि त्याचे इंटरनेटवरील अवलंबित्व किती विस्तारलेले आहे याचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे असेच म्हणावे लागेल.

उदाहरण द्यायचे झाल्यास अलीकडे API किंवा ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटर्फेसचा उदय त्याचे महत्त्व आणखी अधोरेखित करतोय. हल्ल्याला सिक्युरिटी कॉन्फिग्यूरेशन जबाबदार आहे असे त्यातील तज्ञ सांगतात.किंबहुना मोठ्या उद्योगांनी API वापरायला सुरुवात केल्यानंतर API वरील हल्ल्याचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ही झाली नाण्याची दुसरी बाजू. गेल्या वर्षी 2022 च्या तुलनेत या वर्षी म्हणजेच 2023 मध्ये API हल्ल्यात जवळपास 60% हून अधिक वाढ झाली आहे. Indian Computer Emergency Response Team (CERT-In) ने याला दुजोरा दिला आहे. ही खरोखरच चिंतेची बाब आहे. अगदी त्यामधील तांत्रिक तपशीलात जायचे म्हंटले तरी निम्म्याहून अधिक सायबर



फक्त डिजिटल बँकिंगचा विचार करायचा झाल्यास ग्राहक आणि बँकिंग व्यवस्था असे दोन्ही घटक याला मोठ्या प्रमाणात बळी पडले आहेत. स्किमिंग किंवा फिशिंग सारख्या घटनांनी बँकिग व्यवस्था पूर्णपणे विळख्यात सापडताना दिसून आली आहे. रॅमसंवेअरसारख्या यंत्रणांनी तर मोठ्या वित्तीय संस्थांना हादरे देण्यात कसलीही कसर सोडली नाही हे अलीकडील काही उदाहरणातून दिसून येते. मालिशीअस हल्ला हा बँकिंग तंत्रज्ञानातील उणिवा हेरून आक्रमण करतो आणि काही कळायच्या आतच चांगली चालत असलेली प्रणाली विस्कळीत करतो. ऑनलाईन बँकिंगवर मालिशीअस हल्ले होण्यामध्ये भारताचा जगामध्ये चौथा नंबर असून जगातील 8 टक्क्यांहून अधिक योगदान आहे. याचाच अर्थ, ही गोष्ट गांभीर्याने घेण्यासारखी आहे. यामध्ये डेबिट कार्ड क्लोन करून माहिती हस्तगत करण्याचा प्रकार जास्त आढळतो. इतकेच काय, नेटवर्कमध्ये बेकायदेशीरित्या शिरकाव करून ताबा घेण्याचेही प्रकार वाढले आहेत.

## यासंदर्भात रिझर्व्ह बँकेने यासाठी काही महत्वपूर्ण मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत.

### 1. माहिती तंत्रज्ञान व्यवस्था सुरक्षित आणि कार्यक्षम असायला हवी.

बँकांमधील माहिती तंत्रज्ञान व्यवस्था सुरक्षित आणि अद्यावत असावी. बाहेरील सायबर हल्ले रोखण्यासाठी बँकेकडे सक्षम यंत्रणा हवी. वेगवेगळ्या प्रणाली इंस्टॉल करताना त्या अद्यावत आणि व्हायरस पासून सुरक्षित असाव्यात. त्यासाठी लागणारे फायरवॉल कवच अधिक कार्यक्षम असणे गरजेचे आहे.

## 2. तंत्रज्ञान साखळीवर नियमित पाळत ठेवणे

इंग्रजीमध्ये याला Technology Monitoring म्हणतात. दररोज यावर पाळत ठेवणे त्याची देखभाल करणे किंवा डिजिटल यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी रिअल टाइम मध्ये घडणाऱ्या गोष्टींचे Security Operations Centre (SOC) च्या माध्यमातून निरीक्षण करावयास हवे.

## 3. नेटवर्क जाळे अद्यावत करणे

नेटवर्क जाळे सक्षम हवे. सुविधा पुरविणाऱ्या कंपन्या आणि त्यांची अधिकृतता वेळच्या वेळी तपासणे गरजेचे आहे. असेही आढळून आले आहे की काहीवेळेस ठराविक काळासाठी व्यवसाय करणाच्या दृष्टीने नियम बाजूला ठेवून नेटवर्क प्रणाली ॲक्टिव केली जाते. जे सायबर सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनक आहे.

## 4. ग्राहकांच्या माहितीचे संरक्षण करणे

ग्राहकांच्या माहितीचे संरक्षण हे सर्वात महत्वाचे तत्व असून सायबर हल्ल्यासारख्या किंवा व्हायरस धोक्यातून ग्राहकांची माहितीची देवाणघेवाण होता कामा नये. ग्राहकाची माहितीचे संरक्षण करणे हे जबाबदारीचे काम असून तशा प्रकारच्या जबाबदाऱ्या निश्चित करणे गरजेचे आहे. त्याचे निराकरण करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग असणे अपेक्षित आहे.

## 5. सायबर सुरक्षा व्यवस्थापन

प्रत्येक ठिकाणी सायबर सुरक्षा व्यवस्थापन योजना अंमलात आणण्यासाठी नेहमी उच्च स्तरीय बैठका व्हायला हव्यात, त्यामध्ये विशेष समिती असावी. सायबर जागरूकता कार्यक्रम व्हायला हवेत त्यातील तज्ञ लोकांचा त्यामध्ये समावेश असायला हवा.

उच्च प्रकारच्या अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करूनसुद्धा बँकिंग यंत्रणा सायबर हल्ल्यापासून वाचलेल्या नाहीत. ही चिंतेची बाब असली तरी वेळोवेळी दक्षता घेवून सायबर हल्ले रोखणे शक्य आहे. वरती उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक बँकिंग व्यवस्थापकीय मंडळाचे पाहिले प्राधान्य सायबर सुरक्षेला असायला हवे. त्यामध्ये हलगर्जीपणा पूर्ण बँकिंग व्यवस्था आणि पर्यायाने ग्राहकाच्या माहितीची सुरक्षा धोक्यात येवू शकते. उच्च आणि अद्यावत तंत्रज्ञाचा वापर करण्याबरोबरच प्रत्येक गोष्टीचा नियामक मंडळाच्या सहकार्याने Timely Compliance अंमलात आणला तर निश्चितच असे सायबर हल्ले रोखता येतील.